18 OCT 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

| त. भा. प्रतिनिधी

- डॉ. तृप्ती करेकट्टी
- हिंदी दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात बक्षीस वितरण



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करताना उदित घई, डॉ. तृप्ती करेकट्टी, अनमोल कोठाडिया आदी.

कोल्हापूर : स्पर्धांच्या माध्यमातून महाविद्यालय व विद्यापीठ यांचे नाते दृढ होण्यास व विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना नेहमीच वाव मिळतो, असे प्रतिपादन हिंदी विभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये हिंदी विभाग व यूको बँक यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी दिवसानिमित्त आयोजित विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण समारंभप्रसंगी त्या बोलत होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून यूको बँकेचे शाखा व्यवस्थापक उदित घई उपस्थित होते. यावेळी विविध स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

एकपात्री प्रयोग स्पर्धेमध्ये महावीरच्या कार्तिकी गुरवला प्रथम, हिंदी विभागाच्या सुप्रिया पवारला द्वितीय, कमलाच्या श्रेया माळीला तृतीय, हिंदी विभागाच्या अविनाश कांबळे यांना चतुर्थ, साक्षी बाटुंगेला पंचम पुरस्काराने गौरविण्यात आले. शॉर्ट फिल्म मेकिंग स्पर्धेतील शिवाजी विद्यापीठ, हिंदी विभागाच्या 'वर्तमान राजनीति और युवा" (प्रथम), कमला कॉलेजच्या 'युवा दर्शन या भागीदारी" (द्वितीय), न्यू कॉलेजच्या मोबाइल डोपामाइन (तृतीय), शिवाजी विद्यापीठ हिंदी विभागाच्या 'इन्सानियत" (चतुर्थ), महावीर कॉलेजच्या 'सोशल" (पंचम) पुरस्काराने गौरविण्यात आले.

निबंध लेखन स्पर्धेतील महाविद्यालय गटात कमलाच्या गायत्री माने (प्रथम), शहाजीच्या तेजस्विनी रोहिदास (द्वितीय), न्यूच्या प्रतीक्षा पाटील (तृतीय), न्यूच्या दिलनाज अन्सारी (चतुर्थ), महावीरच्या आयान मुल्ला (पंचम) पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच विद्यापीठ गटात शीतल चौगले (प्रथम), अविनाश कांबळे (द्वितीय), सानिया मुल्ला (तृतीय), प्रणाली पाटील (चतुर्थ), वर्षा बोरगल्ली (पंचम) यांना गौरविण्यात आले. काव्य-वाचन स्पर्धेतील महाविद्यालय गटात कमलाच्या सेजल गाडवे (प्रथम), महावीरच्या गुलसनोबर सिद्दीकी (द्वितीय), स.ब. खाडेच्या चैत्राली गुरव (तृतीय), न्यूच्या कस्तुरी धर्माधिकारी (चतुर्थ) कमलाच्या अनन्या जाधव व स.ब. खाडेच्या संस्कृती चव्हाण (पंचम) यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.

काव्य-वाचन स्पर्धेतील विद्यापीठ गटात शीतल चौगुले (प्रथम), अविनाश कांबळे (द्वितीय), संचित कांबळे (तृतीय), विनय जंगम (चतुर्थ), साक्षी बाटुंगे, शब्दा वाघमोडे (पंचम) पुरस्काराने गौरविण्यात आले.

परीक्षक अनमोल कोठाडिया, अंकिता त्रिभुवने, डॉ. नरसिंग एकिले, संतोष कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. आराधना कदम व अविनाश कांबळे यांनी मनोगत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जयसिंग कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अक्षय भोसले केले. आभार डॉ. प्रकाश निकम यांनी मानले. यावेळी डॉ. संतोष कोळेकर, डॉ. प्रवीण चौगले, प्रा. अविनाश पाटील, डॉ. गीता दोडमणी, डॉ. अनिल मकर, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. सारिका कांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2026
सकाळ

जिद्द व चिकाटीच्या बळावर तीन दृष्टिदिव्यांगाचा एम.ए.ला प्रवेश

कोल्हापूर, ता. १७ : दृष्टिहीनतेवर जिद्द व आत्मविश्वासाने मात करत तीन दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात एम.ए. भाग-१ (इतिहास) अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आहे. उच्च शिक्षणाची ओढ आणि शिकण्याची चिकाटी यांच्या बळावर त्यांनी पदव्युत्तर शिक्षणाचा नवा टप्पा सुरू केला आहे.

हणबरवाडी येथील अंध युवक मंच संचलित अंध मुला-मुलींच्या निवासी वसतिगृहातील पवन कागले व विकास पाईकराव, सांगली जिल्ह्यातील पलूस येथील अशोक चौगुले या विद्यार्थ्यांनी दूरशिक्षणाचा पर्याय स्वीकारला. विशेष म्हणजे, अशोक चौगुले यांनी यापूर्वी याच केंद्रातून समाजशास्त्र व राज्यशास्त्र विषयांत एम.ए. पदवी मिळवली आहे. दूरशिक्षण केंद्रातर्फे स्वयंअध्ययन साहित्य, शैक्षणिक मार्गदर्शन, संपर्क सत्रे व ऑनलाईन सुविधांच्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. त्यामुळे दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांनाही उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होत आहे.

ब्रेल नामफलक वाचून विद्यापीठाचे मानले आभार

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग आणि प्रशासकीय विभागांच्या प्रवेशद्वारांवर दृष्टिहीन विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ब्रेल लिपीतील नामफलक लावण्यात आले आहेत. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या प्रवेशद्वारावरील ब्रेल नामफलक वाचल्यानंतर विद्यार्थ्यांनी सुविधेबद्दल विद्यापीठ प्रशासनाचे आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात एम.ए. भाग-१ (इतिहास) अभ्यासक्रमाला प्रवेश घेणारे दृष्टिदिव्यांग विद्यार्थी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2026

तरुण भारत

शिवाजी विद्यापीठात वाचन कट्टा उपक्रम

कोल्हापूर : वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राद्वारे 'वाचन कट्टा' उपक्रमाने संपन्न झाला. या उपक्रमातंर्गत डॉ. धनंजय सुतार प्र.संचालक यांनी प्रास्ताविकेत उपक्रमाची उद्दिष्टे स्पष्ट केली व तरुण पिढीमध्ये वाचनाद्वारे आयुष्य समृद्ध करण्याबाबत मार्गदर्शन केले. उपक्रमाअंतर्गत आरती चव्हाण, शर्मिला सावंत, सौरभ मालणकर व मोहिनी सुर्वे यांनी विविध पुस्तकांतील मजकुरांचे वाचन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये कुलगुरू प्रा. डॉ. रजनीश कामत यांनी वाचनाचे महत्व विषद करत वाचन संस्कृती जपण्याचे आवाहन केले. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनी संशोधन व विकास साधताना ज्ञानवृद्धिकरिता वाचनाचे महत्व स्पष्ट केले. मोहिनी सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. उप-ग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. युवराज जाधव, डॉ. शिवराज थोरात, डॉ. धनंजय गुरव, डॉ. राजेंद्र खामकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2026

तरुण भारत

शिवाजी विद्यापीठात आरोग्यासंबंधी जागृती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मानसशास्त्र अधिविभाग, व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून मानसिक आरोग्य सप्ताह, जनजागृती रॅली व पथनाट्य आयोजित करण्यात आले. पहिल्या दिवशी मानसशास्त्र अधिविभागात पोस्टर प्रदर्शनाने जागृती करण्यात आली. प्रदर्शनाचे उद्घाटन वैद्यकीय अधिकारी व समुपदेशन केंद्र समन्वयक डॉ. विनिता रानडे यांच्या हस्ते झाले.

मानसशास्त्र अधिविभागाच्या विभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मानसिक जनजागृती रॅलीचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. कार्यक्रमासाठी समुपदेशक उर्मिला शुभंकर, सत्यजीत देसाई, मानसशास्त्र विभागाच्या प्र. विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रतिमा पवार, अधिविभागाचे प्राध्यापक डॉ. साक्षी गावडे व विद्यार्थी उपस्थित होते.